# चाळकवाडीत सायबर सुरक्षा मार्गदर्शन

**आळेफाटा :** आळे (ता. जुन्नर) येथील बाळासाहेब जाधव महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी चाळकवाडी येथील शिवांजली विद्यानिकेतन येथे विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षाबाबत मार्गदर्शन केले. आळे महाविद्यालयात क्विक हिल फाउंडेशनच्या माध्यमातून सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हे अभियान राबविण्यात येत आहे. याअंतर्गत संगणकशास्त्र विभागाचे विद्यार्थी शाळा, महाविद्यालयांमध्ये जाऊन जागरूकता निर्माण करीत आहेत. प्राचार्य डॉ. प्रवीण जाधव व विभागप्रमुख नूतन जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात येत आहे. चाळकवाडी येथील शिवांजली विद्यानिकेतनमध्ये साक्षी नेहरकर, शोएब शेख, मोहिनी जगताप, ऋतू नेहरकर, बुशरा पटेल, आकांक्षा कोकाटे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत माहिती दिली. मोबाईलचा वापर करताना सतर्क राहण्याची किती गरज असते, याची माहिती त्यांनी उदाहरणासह दिली. मुख्याध्यापक भानुदास चासकर उपशिक्षक अशोक कुऱ्हाडे, संतोष चव्हाण, प्रशांत शेटे, बंडू सदामते, विष्णू बोरसे, कमल शिरोळे, आशा पानसरे, अण्णासाहेब घुले, चंद्रकांत साळवे, महेश कुऱ्हाडे उपस्थित होते.